# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.08.2025** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या जपान भेटीवर; टोकियोमध्ये 15व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होणार
2. देशातल्या पहिल्या सेमीकंडक्टर चिप निर्मिती प्रकल्पाचं गुजरातमध्ये उद्घाटन
3. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन
4. पुरुषांच्या आशिया करंडक हॉकी स्पर्धेला आजपासून बिहारमध्ये सुरूवात आणि
5. देशाच्या विविध भागात आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा

**पंतप्रधान-जपान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या जपान दौऱ्यासाठी आज सकाळी टोकियो इथं दाखल झाले असून अत्यंत उत्साही वातावरणात त्यांचं भव्य स्वागत करण्यात आलं. टोकियोमध्ये होणाऱ्या 15व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत ते सहभागी होणार आहेत. जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्या निमंत्रणावरून ही भेट होत आहे. शिखर परिषदेदरम्यान, दोन्ही नेते द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेणार आहेत. तसंच गेल्या 11 वर्षांत वृद्धिंगत होत असलेली धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी पुढे नेण्याच्या दृष्टीनं दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा होण्याची अपेक्षा आहे. जपानच्या दोन दिवसांच्या दौऱ्यानंतर पंतप्रधान मोदी चीन दौऱ्यावर जाणार आहेत; तियानजिन इथं होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत ते सहभागी होतील. या महत्त्वपूर्ण दौऱ्यामुळे भारताच्या राष्ट्रीय हिताबरोबरच प्रादेशिक आणि जागतिक शांतता, सुरक्षा तसंच शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी सहकार्य निर्माण होण्यास हातभार लागेल, असं पंतप्रधान मोदी यांनी जपानला रवाना होण्यापूर्वी जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेच्या अनुषंगानं राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि इतर नेत्यांना भेटण्यास आपण उत्सुक आहोत, असंही पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

**अश्विनी वैष्णव**

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी काल गुजरातमधल्या अहमदाबादजवळील साणंद इथं सीजी पॉवरच्या पहिल्या बाह्यकंत्राटी जुळवणी आणि चाचणी सुविधेच्या पहिल्या प्रकल्पाचं उद्घाटन केलं. या प्रसंगी बोलताना, भारतातील सेमीकंडक्टर उद्योगासाठी हा एक मैलाचा दगड असल्याचं सांगत या प्रकल्पामध्ये पहिली मेड-इन-इंडिया सेमीकंडक्टर चिप तयार केली जाईल, असं वैष्णव यांनी सांगितलं. 2032 पर्यंत कुशल सेमीकंडक्टर व्यावसायिकांची जागतिक कमतरता एकीकडे जाणवत असताना केंद्र सरकारनं या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी देशातील 270 विद्यापीठांना अत्याधुनिक चिप उत्पादन तंत्रज्ञानानं सुसज्ज केल्याचं ही वैष्णव यांनी सांगितलं. साणंद इथं काल उद्घाटन झालेल्या या प्रकल्पात दररोज पाच लाख चिप्सची निर्मिती करण्याची क्षमता असणार असून चिप असेंब्ली, पॅकेजिंग, चाचणी आणि चाचणीनंतरच्या सेवा हाताळण्यासाठी हा प्रकल्प सुसज्ज असेल. तसंच हा प्रकल्प 2027 पर्यंत पूर्णपणे कार्यरत होईल.

**<u>अर्थमंत्री-मुंबई</u>**

अमेरिकेनं लादलेल्या अतिरिक्त आयातशुल्कामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात अनिश्चितता निर्माण झाली आहे. या परिस्थितीत कामगारांना त्यांचा रोजगार कायम राहील याची खात्री द्यावी, असं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी उद्योजकांना केलं आहे. FIEO, अर्थात भारतीय निर्यातदार संघटनांच्या महासंघाच्या शिष्टमंडळानं काल त्यांची भेट घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जागतिक संकटातही कामगारांच्या उपजीविकेचं रक्षण करणं महत्वाचं आहे, असं त्या म्हणाल्या. केंद्र सरकार देशातल्या निर्यातदारांच्या पाठीशी ठामपणे उभं राहील, त्यांच्या सर्व चिंता दूर करण्यासाठी आणि त्यांचं हित जपण्यासाठी शक्य ती सर्व पावलं सरकार उचलेल, अशी ग्वाही अर्थमंत्र्यांनी दिली.

**<u>अर्थमंत्री भेट-मुंबई</u>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कतारचे परराष्ट्र व्यापार खात्याचे राज्यमंत्री डॉ. अहमद बिन मोहम्मद अल सय्यद यांनी काल नवी दिल्लीत भेट घेतली. द्विपक्षीय संबंध दृढ करणे आणि गुंतवणूक वाढवण्यावर यावेळी चर्चा झाली.

**<u>शक्तिपीठ</u>**

महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील पवनार ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रादेवी दरम्यानच्या; शक्तीपीठ महामार्गाच्या पवनार ते सांगली या आखणीला; आणि त्यासाठीच्या भूसंपादनाला राज्य सरकारनं प्रशासकीय मान्यता दिली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागानं काल यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. यात मूळ मंजूर आखणीपैकी कोल्हापूर जिल्ह्यातील आखणीची यापूर्वी काढलेली अधिसूचना रद्द करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील आखणीचे सर्व उपलब्ध आणि संभाव्य पर्याय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला देण्यात आले आहेत. या पर्यायांबाबत कोल्हापुरातले मंत्री आणि लोकप्रतिनिधीशी चर्चा करुन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अंतिम निर्णय घेणार आहेत. महाराष्ट्र शक्तीपीठ या प्रस्तावित महामार्गामुळे तुळजापूर, कोल्हापूर, माहूर यांसह 18 धार्मिक स्थळ जोडली जाणार आहेत. सुमारे 802 किलोमीटर लांबीच्या या महामार्गामुळं नागपूर-गोवा हा 18 तासांचा प्रवास अवघ्या 8 तासात होण्याची शक्यता आहे.

**<u>रशिया-युक्रेन</u>**

रशियानं युक्रेनवर केलेल्या हल्ल्यांनंतर कीवमधील मृतांची संख्या 23वर पोहोचली असून किमान 48 जण जखमी झाले आहेत. या हल्ल्यांमुळे कीवमधील युरोपियन युनियन मिशन आणि ब्रिटिश कौन्सिल मुख्यालयासह सात जिल्ह्यांमधील अनेक इमारतींचं नुकसान झालं आहे. बचाव पथकं, मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा शोध घेत असून मृतांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. दोन्ही देशांमध्ये युद्ध सुरू झाल्यापासून रशियानं केलेला हा सर्वात मोठा हल्ला होता; असं कीवच्या हवाई दलाने म्हटलं आहे. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. दरम्यान दोन्ही देशांमध्ये शांततेसाठी चर्चा व्हावी अशी रशियाची भूमिका आहे; मात्र त्याचवेळी लष्करी कारवाईही सुरूच आहे असं क्रेमलीननं म्हटलं आहे.

**<u>इस्रायल</u>**

इस्रायलनं येमेनची राजधानी साना इथं काल हवाई हल्ले केले. साना शहराच्या दाट लोकवस्तीच्या भागात हे हल्ले झाले. इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी या हल्ल्यांना दुजोरा दिला असून हे हवाई हल्ले हुथी नेत्यांना लक्ष्य करून करण्यात आल्याचं इस्रायलच्या सरकारी माध्यमांनी सांगितलं आहे. इस्रायली सैन्याने येमेनमधून सोडलेले दोन ड्रोन रोखल्याचे वृत्त दिल्यानंतर काही तासांतच हे हल्ले करण्यात आले. दरम्यान या दोन्ही घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्याचं वृत्त नाही.

**राष्ट्रीय क्रीडा दिन**

आज राष्ट्रीय क्रीडा दिन आहे. महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 29 ऑगस्टला हा दिवस साजरा केला जातो. "शांततापूर्ण आणि सर्व समाज घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी खेळ" अशी यंदाच्या राष्ट्रीय क्रीडा दिनाची मध्यवर्ती संकल्पना आहे. यानिमित्तानं खेळाच्या मैदानावर एक तास या सारख्या उपक्रमांसह आजपासून 31 ऑगस्ट पर्यंत देशभर फिटइंडिया मिशनअंतर्गत विविध क्रीडाविषयक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**हॉकी**

पुरुष हॉकी आशिया करंडक 2025 ला आजपासून बिहारमध्ये सुरूवात होत आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या भारतीय तसंच आशियातील सर्व संघांच्या खेळाडूंना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. भारत आणि आशियातील लाखो लोकांच्या हृदयात हॉकी या खेळला एक विशेष स्थान आहे, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. या स्पर्धेत रोमांचक सामन्यांच्या माध्यमातून असाधारण प्रतिभेचं प्रदर्शन घडेल असा पंतप्रधानांनी व्यक्त केला. अलिकडच्या काळात, बिहारनं खेलो इंडिया युथ गेम्स, आशिया रग्बी अंडर 20 सेव्हन्स चॅम्पियनशिप आणि महिला आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी सारख्या महत्त्वाच्या क्रीडा स्पर्धांचं आयोजन करून एक उत्साही क्रीडा केंद्र म्हणून आपली छाप पाडली आहे. असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**नीरज चोप्रा**

भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्रानं काल रात्री स्वित्झर्लंडमधील झुरिच इथं झालेल्या डायमंड लीग अंतिम स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत आंतरराष्ट्रीय भालाफेक स्पर्धेत सलग 26वे स्थान पटकावलं. शेवटच्या आणि सहाव्या प्रयत्नात चोप्रानं 85 पूर्णांक 10 मीटर भाला फेकून उपविजेतेपद पटकावलं. तर 91 पूर्णांक 51 मीटर अंतरावर भाला फेकून जर्मनीच्या ज्युलियन वेबरनं सुवर्णपदक पटकावलं.

**पूर-पाऊस**

महाराष्ट्र राज्याच्या विविध भागात काल पावसानं जोरदार हजेरी लावली. प्रामुख्यानं मराठवाड्यातल्या काही जिल्ह्यात पावसानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. नांदेड जिल्ह्यात पूरपरिस्थिती गंभीर झाली असून देगलूर तालुक्यातील 2 हजार 236 नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलं आहे. तर पुरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर लातूरमधल्या शाळांना आज सुट्टी देण्यात आली आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज अरुणाचल प्रदेश, कर्नाटकचा किनारवर्ती भाग, मध्य महाराष्ट्र आणि उत्तराखंडमधल्या काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तसंच गुजरात, कर्नाटक, केरळ, माहे, कोकण, गोवा, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, सिक्कीम, तेलंगणा आणि विदर्भातही मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. ईशान्य भारतातही अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. तर पूर्व राजस्थान, हरियाणा, चंदीगड, हिमाचल प्रदेश आणि पंजाबमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. याशिवाय, अंदमान निकोबार द्वीपसमूह, बिहार, जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, झारखंड आणि तेलंगणा इथं विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळ होण्याची शक्यता आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**